## निशाणी क्रमांक १३ वरील आदेश
(दिनांक ११.०७.२०२४ रोजी घोषित)

अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे :-**

२) गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचा पती आहे तसेच गैरअर्जदार क्र.२ हा दिर, गैरअर्जदार क्र.३ ही ननंद, व गैरअर्जदार क्र.४ ही सासू आहे. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ याची कायदेशीर लग्नाची पत्नी असुन त्यांचा विवाह दिनांक २२.०५.२०१६ रोजी त्यांच्या समाजातील रितीरिवाजाप्रमाणे संपन्न झाला होता. लग्नानंतर, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ याचे सोबत डोंगरमौदा येथे गैरअर्जदार क्र.१ याचे घरी नांदण्यास गेली होती व गैरअर्जदार क्र.१ याचे सोबत संसार करु लागली होती. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ ते ४ हे सोबत राहत होते. लग्नानंतर, १ महिना डोंगरमौदा येथे राहिल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला विशाखापट्टणम येथे घेऊन गेला होता. तिथे १ महिना राहिल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिच्या चारित्र्यावर संशय घेणे सुरु केले होते. गैरअर्जदार क्र.१ याने स्वत:च्या साहेबा सोबतच अर्जदार क्र.१ हिचे संबंध आहेत असा संशय घेतला होता व या कारणावरुन भांडण करुन अर्जदार क्र.१ हिला कंबरेच्या पट्टयाने मारहाण व शिवीगाळ करु लागला होता. आठ दिवस तिथे राहिल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिचे सोबत मुळ गावी परत आला होता.

३) त्यानंतर, अर्जदार क्र.१ ही विशाखापट्टणमला परत जातांना सासु व सास-यांना सोबत घेऊन गेली होती. विशाखापट्टणमला ८ ते १० दिवस राहिल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ ने स्वत:च्या वडीलासोबत अर्जदार क्र.१ हिचे अनैतिक संबंध आहे असा संशय घेतला होता. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिऊन लहान-सहान कारणावरुन भांडण करुन अर्जदार क्र.१ हिला अश्लिल

शिवीगाळ करुन मारहाण करीत होता. गैरअर्जदार क्र.१ हा विशाखापट्टणम वरुन बदली करुन कारवार (कर्नाटक राज्य) येथे राहायला गेला होता. तिथे गेल्यानंतर सुध्दा, गैरअर्जदार क्र.१ याच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा दारु पिऊन अर्जदार क्र.१ हिला धमकी देत होता की, 'तु घडलेला प्रकार घरी सांगितला किंवा पोलीसात रिपोर्ट दिला तर तुला व तुझ्या घरच्या लोकांना कापून फेकेन'. गैरअर्जदार क्र.१ हा दररोज कोणत्याही कारणावरुन भांडण करुन अर्जदार क्र.१ हिला कंबरेच्या पट्टयाने मारहाण करीत होता. अर्जदार क्र.१ हिची आई तिला तिचे घरी घेऊन जाण्याकरीता विशाखापट्टणम येथे आली असता गैरअर्जदार क्र.१ याने तिला आईसोबत पाठविले नाही व अर्जदार क्र.१ हिची आई गेल्यावर गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला त्याच्या मित्राच्या घरी सोडून गायब झाला होता व २ ते ३ दिवस आला नव्हता. अर्जदार क्र.१ हिने गैरअर्जदार क्र.१ याला फोन केला असता तिला सांगितले की, तो ४ ते ५ दिवस येणार नाही तेव्हा अर्जदार क्र.१ हिने दुस-यांना फोन मागुन पोलीसांना फोन केला होता व पोलीसांना सर्व माहिती सांगुन तिथुन मौजा पचखेडी येथे तिचे माहेरी आली होती.

४) त्यानंतर, ४ ते ५ महिन्यांनी अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ चा अपघात झाल्याबाबतचा फोन आला होता तेव्हा अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ याचेकडे नांदण्यास गेली होती. दोन मुले झाल्यानंतर सुध्दा पतीच्या वागणुकीत कोणताही फरक पडला नाही व गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला पुर्वीपेक्षा अधिक त्रास देऊ लागला. अर्जदार क्र.१ ही सर्व अत्याचार, छळ, मारहाण तसेच शारीरीक व मानसिक त्रास या आशेवर सहन करीत होती की, एक दिवस पतीच्या वागणुकीत सुधारणा होईल व संसार सुखाचा होईल, पण गैरअर्जदार क्र.१ च्या वागणुकीत कोणतीही सुधारणा न होता उलट तो अर्जदार क्र.१ हिला जास्त मानसिक व शारीरीक त्रास देऊ लागला होता तसेच जिवे मारण्याची धमकी देऊ लागला होता. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिला म्हणायचा की, 'तुला कोणताही अधिकार नाही, आपल्यामध्ये कोणताही संबंध नाही, तुझे काम फक्त घरची कामे करणे आणि चुपचाप राहणे' असे बोलून अर्जदार क्र.१ हिचा अपमान करीत होता. तसेच 'तुझ्या चेह-याकडे बघण्याची माझी इच्छा नाही, तुझ्यावर थुंकायची इच्छा होते, तुझ्यासोबत कोण राहणार, एका लंगडीची सेवा करीन पण तुझ्या सोबत राहणार नाही,

माझ्या घरून निघून जा' असे वारंवार बोलून अर्जदार क्र.१ हिचा मानसिक छळ करीत असे व तिला अपमानित करीत होता. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ यांचेकडेही मुळीच लक्ष देत नव्हता, याबाबत गैरअर्जदार क्र.२ व ४ यांना सांगीतले असता तेही अर्जदार क्र.१ हिला म्हणायचे की, 'तु तेथून निघून आली तर आम्ही तुला खोटया केसमध्ये फसवू'. त्यामुळे, अर्जदार क्र.१ हिने पोलीस स्टेशन, कारवार येथे तक्रार नोंदविली होती. पोलीसांनी समजाऊन सुध्दा गैरअर्जदार क्र.१ याच्या वागणुकीत कोणतीही सुधारणा झाली नाही, म्हणुन अर्जदार क्र.१ ही जिवाच्या भितीने गैरअर्जदार क्र.१ याचे घर सोडुन दिनांक ०८.०९.२०२१ पासुन तिच्या आईकडे मौजा पचखेडी येथे राहत आहे.

५) अर्जदार क्र.१ ही घरातील सर्व कामे करीत होती व गैरअर्जदार क्र.१ चा पती म्हणुन सन्मान करीत होती तसेच अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांना लग्न संबंधातून दोन मुले नामे तोशीत सुनिल तागडे व वंशील सुनिल तागडे आहेत. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला व तिच्या दोन्ही मुलांना कोणतीही आर्थिक मदत केली नाही. तसेच अर्जदार क्र.१ ही व तिचे दोन्ही मुले ही गैरअर्जदार क्र.१ वर अवलंबुन आहेत. अर्जदार क्र.१ हिचे स्वत:चे आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून, ती व तिचे दोन्ही मुले सध्या तिच्या आईच्या दयेवर जीवन जगत आहेत. अर्जदार क्र.१ हिचे वडील मयत असून तिची आई वृध्द असुन तिच्या आईची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे, त्यामुळे अर्जदार क्र.१ व तिच्या मुलांची आर्थिक स्थिती अतिशय नाजुक आहे. अर्जदार क्र.१ व तिच्या दोन्ही मुलांना गैरअर्जदार क्र.१ याच्या आर्थिक मदतीशिवाय जीवन जगणे कठीण झाले असुन त्यांना तातडीची अंतरीम पोटगी न मिळाल्यास त्यांचेवर उपास मारीची वेळ येऊ शकते.

६) गैरअर्जदार क्र.१ चे मौजा डोंगरमौदा, ता.कुही, जि.नागपूर येथे पक्के मकान असुन, गैरअर्जदार क्र.१ हा केंद्र शासनाच्या नेव्हलशिप रिपेअर यार्ड या विभागात कारवार येथे कुशल कामगार या पदावर काम करीत असुन त्याला मासिक रुपये ३५,०००/- पगार मिळतो, गैरअर्जदार क्र.१ ची नौकरी कारवार, जिल्हा उत्तरकन्नडा (कर्नाटक राज्य) येथे आहे. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ ते ३ यांना संयुक्त प्रतिमहा रुपये २२,०००/- दैनंदिन आवश्यक गरजा व संगोपणासाठी सहज देऊ शकतो.

७) अर्जदारांना नुकसान भरपाईच्या स्वरुपात वैद्यकीय खर्चाबाबत, वस्त्र व ईतर आवश्यक मुलभुत घरगुती सामान घेण्याकरीता रु.५,००,०००/- आर्थिक मदत देण्याकरीता आदेश होणे गरजेचे आहे तसेच अर्जदार क्र.१ व मुलांना रुपये २२,०००/- प्रतिमहा उदरनिर्वाहाकरीता देणेबाबत आदेश होणे गरजेचे आहे. अर्जदारांना न्यायालयीन खर्चाकिरीता रुपये १०,०००/- देण्याचा आदेश होणे गरजेचे आहे. त्यामूळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

८) प्रस्तुत प्रकरणी गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांना नोटीस बजावणी झाली व त्यांनी मुळ अर्जावर नि.क्र.१२ प्रमाणे त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यानंतर, अर्जदार क्र.१ ते ३ यांनी दिनांक २१.०४.२०२१ रोजी नि.क्र.१३ प्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. गैरअर्जदारांना वारंवार संधी देऊन सुद्धा त्यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही त्यामूळे त्यांच्या लेखी जवाबातील म्हणणे नि.क्र.१३ च्या अंतरीम अर्जासाठी गृहीत धरण्यात येत आहे.

९) गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ सोबत झालेला विवाह मान्य केला आहे तसेच गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचेसोबतचे असलेले नातेसंबंध सुद्धा मान्य केलेले आहेत. गैरअर्जदारांनी अर्जदारांच्या अर्जामधील त्याव्यतिरीक्त कथने अमान्य केली आहेत.

१०) अर्जदार यांच्यातर्फे सन्माननीय विधिज्ञ श्री.एम.आर. कावळकर यांचा युक्तिवाद ऐकला. गैरअर्जदारांतर्फे युक्तीवाद करण्याकरीता कोणीही हजर नाही.

११) खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होत असुन त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहेत :-

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र.१ हिने सिद्ध केले काय की, गैरअर्जदारांनी अर्जदारांचा कौटूंबिक हिंसाचार केला आहे? | होय |
| २) | अर्जदार क्र.१ हिने सिद्ध केले काय की, अर्जदार क्र.१ ते ३ हे गैरअर्जदार क्र.१ याचे कडुन उदरनिर्वाहाकरीता दरमहा रु. २२,०००/- अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र | होय. अर्जदार क्र.१ हिला रुपये ३,०००/- तसेच अर्जदार क्र.२ याला रुपये २,०००/- तसेच अर्जदार |

| | | |
|---|---|---|
| | आहेत? असल्यास किती रक्कम? | क्र.३ याला रुपये २,०००/- गैरअर्जदार क्र.१ याने दयावी. |
| ३) | काय आदेश? | अर्जदारांचा अर्ज अंशत: मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

१२) महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदींचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निर्गतीसाठी माझेपुढे उपस्थित झालेले मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितरित्या करणे सोयीचे ठरत आहे.

**मुद्दा क्रमांक १ व २ च्या बाबत** :-

१३) कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याअंतर्गत कोणत्याही प्रकारची मदत मिळण्याकरीता अर्जदारांचे गैरअर्जदारासोबत कौटूंबिक संबंध होते व गैरअर्जदारांकडुन तिचा कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब सिध्द करणे गरजेचे आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र.१ हिचा कौटुंबिक हिंसाचार केल्याबाबतचा अनेक घटनांचा उल्लेख अर्जदार क्र.१ हिने तिच्या अर्जामध्ये केला आहे, त्यापैकी अर्जदार क्र.१ चे कथनांनुसार काही महत्वाचे आरोप असे आहेत की, गैरअर्जदार क्र.१ याला पूर्वीपासूनच दारू पिण्याचे व्यसन होते. तसेच लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदारांकडे नांदण्यास गेल्यानंतर गैरअर्जदार क्र.१ हा तिला दारू पिऊन मारण्याची धमकी देत होता की, 'जर अर्जदार क्र.१ हिने तिच्या घरी झालेली घटना सांगितल्यास तिच्या घरच्यांना कापून फेकेन'. अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ हा शिवीगाळ करून मानसिक त्रास देत होता तसेच तिला अपमानित करीत होता. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ हिच्या चारित्र्यावर संशय घेत होता तसेच स्वत:च्या साहेबा सोबतच अर्जदार क्र.१ हिचे संबंध आहेत असा संशय घेत होता, सदर कारणावरुन गैरअर्जदार क्र.१ हा भांडण करुन अर्जदार क्र.१ हिला कंबरेच्या पट्टयाने मारहाण व शिवीगाळ करु लागला होता. गैरअर्जदार क्र.१ ने स्वत:च्या वडीलासोबत अर्जदार क्र.१ हिचे अनैतिक संबंध आहे असा संशय घेत होता. अर्जदार क्र.१ हिला जास्त मानसिक व शारिरीक त्रास देऊ लागला होता तसेच जिवे मारण्याची धमकी देऊ लागला होता. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार

क्र.१ हिला म्हणायचा की, 'तुला कोणताही अधिकार नाही, आपल्यामध्ये कोणताही संबंध नाही, तुझे काम फक्त घरची कामे करणे आणि चुपचाप राहणे' असे बोलून अर्जदार क्र.१ हिचा अपमान करीत होता. तसेच 'तुझ्या चेह-याकडे बघण्याची माझी इच्छा नाही, तुझ्यावर थुंकायची इच्छा होते. तुझ्यासोबत कोण राहणार, एका लंगडीची सेवा करीन पण तुझ्या सोबत राहणार नाही. माझ्या घरून निघून जा' असे वारंवार बोलून अर्जदार क्र.१ हिचा मानसिक छळ करीत असे व तिला अपमानित करीत होता. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.२ व ३ यांचेकडेही मुळीच लक्ष देत नव्हता, याबाबत गैरअर्जदार क्र.२ व ४ यांना सांगीतले असता तेही अर्जदार क्र.१ हिला म्हणायचे की, 'तु तेथून निघून आली तर आम्ही तुला खोटया केसमध्ये फसवू'. त्यामूळे अर्जदार क्र.१ ही जिवाच्या भितीने गैरअर्जदार क्र.१ याचे घर सोडुन दिनांक ०८.०९.२०२१ पासुन तिच्या आईकडे मौजा पचखेडी येथे राहत आहे.

१४) अर्जदार क्र.१ ने नमूद केलेले कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप गैरअर्जदारांनी नाकारले आहेत तसेच गैरअर्जदार क्र.१ याचे कथनानुसार अर्जदार क्र.१ हिचे सर्व आरोप खोटे आहेत. अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र. १ यांच्या कथनाचे अवलोकन केले असता असे दिसते की, त्यांनी एकमेकांवर आरोप व प्रत्यारोप केलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांनी एकमेकांवर केलेल्या आरोपांची शहानिशा अथवा संविधानिकता तपासण्याकरिता निश्चितच सखोल पुराव्याची गरज आहे. परंतू, या क्षणी अर्जदार व गैरअर्जदार यांची पुराव्याची बाजु अद्याप सुरु झालेली नाही. निश्चितच दोन्ही पक्षांना त्यांची बाजु सिध्द करण्याकरीता पुरेशी संधी देण्याचे व पुरावा देण्याचे अधिकार आहेत. परंतु, सदरचा अर्ज हा अंतरीम निर्वाह/पोटगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्ज मंजुर होण्याकरिता या क्षणी हे बघणे गरजेचे आहे की, गैरअर्जदारांमार्फत अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार झालेला आहे अथवा नाही. त्याकरीता, वर नमुद केल्याप्रमाणे दोन्ही पक्षांची कैफियत व प्रथमदर्शनी दाखल केलेले कागदोपत्री पुरावे व सद्याची परिस्थिती विचारात घेणे सुध्दा गरजेचे आहे.

१५) एकंदरीत गैरअर्जदार यांचा बचाव व अर्जदार हिची कैफियत या सर्वांचा सर्वांगाने विचार करता असे दिसुन येते की, आज रोजी अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ पासुन वेगळे राहत असून तिच्या आईच्या दयेवर आज

रोजी जीवन जगत आहे. भारतीय संस्कृतीशी निगडीत तसेच नैसर्गिक न्याय तत्वानुसार प्रत्येक पुरुषाला लग्नानंतर त्याच्या पत्नीला सांभाळण्याची जबाबदारी दिलेली आहे. एखाद्या स्त्रिशी विवाह करणे म्हणजे (जर ती स्त्री स्वत:चे पालनपोषण करण्यास असमर्थ असेल) तिचे पालनपोषण करण्याची जबाबदारी स्विकारणे होय. दुस-या शब्दात सांगायचे झाल्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार पुरुष हा दणकट व मजबुत शरीरयष्टीचा असल्याने त्याचेवर स्त्रिला सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. याअनुषंगाने, एक बाब नमूद करणे आवश्यक आहे की, प्रस्तुतचा अंतरीम पोटगी बाबतचा अर्ज निकाली काढतांना सफल चौकशी करण्याची आवश्यकता नाही. अर्जदार क्र.१ हिने अर्जातील सर्व आरोप सत्य प्रतिज्ञेवर कथन केले आहे. अर्जदार क्र.१ ही स्त्री आहे व कोणतीही स्त्री विनाकारण तिच्या संसाराचा त्याग करून राहणार नाही. त्याचप्रमाणे, संरक्षण अधिकारी याने कौटुंबिक घटना अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे, त्यामध्ये कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना नमूद आहे. सदरचा पुरावा सकृतदर्शनी विचारात घेणे आवश्यक आहे. निश्चितच लग्न झालेले दांपत्य कारण नसतांना त्याचे जोडीदारापासून वेगळे राहणार नाही. या क्षणी अर्जदारांनी केलेली कैफियत गैरअर्जदारांच्या बचावापेक्षा अधिक विश्वासार्ह दिसुन येते. त्यामुळे अर्जदारांची कैफियत विचारात घेता गैरअर्जदार क्र. १ द्वारे अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियमाचे कलम २३ अन्वये प्रथमदर्शनी गैरअर्जदारांद्वारे अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार होत असल्याचे निदर्शनास आल्यास न्यायालय अर्जदारांना अंतरीम खावटी/निर्वाह मंजुर करु शकते. अशा परिस्थितीत, वर नमुद विंवचनेवरुन अर्जदार ही आज रोजी गैरअर्जदारांपासून वेगळे जीवन जगत आहे हे सत्य शाबीत होते. तसेच वर कथन केल्याप्रमाणे प्रथमदर्शनी अर्जदाराला गैरअर्जदारांकडुन कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सुध्दा स्पष्ट होते. यावरून, गैरअर्जदार क्र.१ ते ४ यांनी अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसून येत आहे.

१६) अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांनी दिनांक २२.०५.२०१६ रोजी त्यांचा विवाह झाला होता ही बाब मान्य केली आहे. तसेच लग्न संबंधातून त्यांना दोन मुले नामे तोशीत व वंशील असल्याचे सुद्धा मान्य केले. गैरअर्जदार क्र.१ याने मान्य केले की, विवाह झाल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ ने

अर्जदार क्र.१ हिला मौजा डोंगरमौदा येथे नांदण्यासाठी आणले होते व लग्नानंतर आठ दिवसांनी दोघेही विशाखापट्टणम येथे गेले होते. अर्जदार क्र.१ ही एकत्र कुटुंबांत राहीली असल्याचे दिसते. यावरून अर्जदार क्र.१ व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह झाला तसेच त्यांचे कौटूंबिक संबंध असून एकत्रित नांदले ही बाब सिध्द होते. त्यामूळे, अर्जदार क्र.१ हिला मानसिक त्रास झाल्याचे दिसून येते. त्यामुळे सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

१७) अर्जदार क्र.१ हिने लग्नपत्रिकेची मूळ प्रत, लग्नाचा फोटो, मुलांचे जन्म प्रमाणपत्र, आधारकार्ड, नोंदणीकृत विवाह प्रमाणपत्र, आदंन यादी, एन.सी.आर. प्रत तसेच माहे जुलै २०२१ रोजीची गैरअर्जदार क्र.१ याचे पगारपत्रक अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ हिने नि.क्र.१८ प्रमाणे तिचे मालमत्ता व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यामध्ये गैरअर्जदार क्र.१ याला दरमहा रूपये २८,६६६/- इतका पगार मिळतो असे नमूद आहे तसेच तिच्याकडे तिच्याकरीता व मुलांकरीता उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही असे नमूद आहे. त्याचप्रमाणे, गैरअर्जदार क्र.१ याने नि.क्र.२१ प्रमाणे त्याचे मालमत्ता व दायित्व बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे व त्यामध्ये त्याला सामान्य खर्चाकरीता रूपये ३,५००/- लागते तसेच हात उसने म्हणून नातेवाईकाकडून रूपये ५०,०००/- घेतल्याचे नमूद असून त्याला दरमहा रूपये २०,०००/- पगार मिळतो असे नमूद आहे, परंतु अभिलेखावर असलेले पगार पत्रक बघितले असता त्यामध्ये रूपये २८,६६६/- दिसून येते.

१८) पोटगीची रक्कम ठरवितांना उभय पक्षकार यांचे राहणीमान, त्यांचे उत्पन्न, गैरअर्जदार यांचे उत्पन्न, गैरअर्जदार क्र.१ याचेवर कोण कोण अवलंबून आहेत, वैद्यकीय खर्च, जिवनावश्यक वस्तुच्या किंमती, कपडेलत्ते, व घर खर्च इत्यादी बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणातील अर्जदारांचे व गैरअर्जदारांचे राहणीमान सर्वसामान्य दिसून येते. गैरअर्जदार क्र.१ याला उत्पन्नाचे पुरेसे साधन आहे. अर्जदार क्र.१ ही हिच्या आईच्या घरी राहत आहे. त्यामूळे, अर्जदार यांना सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ याची आहे.

१९) अर्जदार क्र.१ हिच्या कथनानूसार तिला व तिच्या मुलांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही, त्यामुळे, अर्जदार क्र.१ ही व तिच्या मुलांचे

पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार क्र.१ हा सुदृढ व्यक्ती आहे. गैरअर्जदार क्र.१ हा केंद्र शासनाच्या नेव्हलशिप रिपेअर यार्ड या विभागात कारवार येथे कुशल कामगार या पदावर असुन त्याला माहे जुलै २०२१ च्या पगार पत्रकाप्रमाणे मासिक रक्कम रूपये २८,६६६/- एवढा पगार आहे असे कथन केले आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत गैरअर्जदार क्र.१ यांच्याकडुन त्यांना संयुक्त दरमहा रक्कम रुपये २२,०००/- इतकी पोटगी रकमेची मागणी केली आहे. अर्जदार क्र.१ यांनी कथन केल्याप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांचे उत्पन्न पाहता मागणी केलेली पोटगीची रक्कम ही अवाजवी वाटत आहे. गैरअर्जदार क्र.१ यांच्यावर अर्जदारांचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र.१ हा शारीरीकदृष्टया सबळ असुन त्याला केंद्र शासनाची नोकरी असुन त्याला उत्पन्नाचे साधन असल्याचे अर्जदार क्र.१ यांच्या कथनावरुन स्पष्ट होत आहे. गैरअर्जदार क्र.१ याने कोठेही तो नोकरीवर नाही तसेच त्याला मासीक पगार हा अर्जदार क्र.१ हिने अर्जात नमूद केल्याप्रमाणे मिळत नाही याबद्दल त्याचे लेखी जबाबामध्ये नाकारले नाही. तसेच नि.क्र.२१ वर असलेले मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रावरून सुद्धा गैरअर्जदार क्र.१ वर जास्त जबाबदारी असल्याचे दिसून येत नाही. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार यांच्या उदनिर्वाहासाठी दरमहा पोटगी रकमेची तजबीज करण्याची जबाबदारी आहे. परंतू, गैरअर्जदार क्र. १ हा सदर प्रकरणात हजर होऊन सुध्दा त्याने अर्जदारांची उदरनिर्वाहाकरीता आजपावेतो कोणतीही सोय/तजबीज केली नाही तसेच सदर प्रकरणात हजर सुद्धा राहत नाही म्हणून अर्जदारांना अंतरीम पोटगी अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासुन देणे योग्य व न्यायोचित होईल, म्हणुन अर्जदार क्र.१ ते ३ हे गैरअर्जदार क्र. १ यांच्याकडुन त्यांनी मागणी केलेल्या अंतरीम पोटगी रकमेपैकी अंशत: अंतरीम पोटगी मिळणेस पात्र आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र. १ ला ३,०००/- रुपये, अर्जदार क्र.२ ला २,०००/- रुपये व अर्जदार क्र.३ ला २,०००/- रुपये त्यांच्या उदनिर्वाहासाठी दरमाह अंतरीम पोटगी मिळणेस पात्र ठरत आहे. त्यामुळे, मुददा क्रमांक २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ च्या बाबत</u>** :-

२०) वरील मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्षावरुन प्रस्तुतचा अर्ज हा अंशत: खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मुद्दा क्र. ३ चे निष्कर्षाकरीता

मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१) अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२) गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ हिला अर्ज दाखल केल्याच्या तारखेपासून दरमहा रक्कम रूपये ३,०००/-, अर्जदार क्र.२ ला रक्कम रूपये २,०००/- व अर्जदार क्र.३ ला रक्कम रूपये २,०००/- अंतरीम पोटगी दयावी. अर्जदार क्र.२ व ३ यांचे वतीने अंतरीम पोटगीची रक्कम अर्जदार क्र.१ ही स्विकारणेस पात्र आहे.

३) या आदेशाची प्रत अर्जदारांना व गैरअर्जदारांना विनामुल्य देण्यात यावी.

NARESH JANRAO DESHMUKH
Digitally signed by NARESH JANRAO DESHMUKH
Date: 2024.07.18 13:02:38 +0530

दिनांक : ११.०७.२०२४
कुही

(न. जा. देशमुख)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, कुही